आजचा दिनविशेष

१९६० : विद्याधर गोखले यांच्या पंडितराज जगन्नाथ या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार ९ ऑक्टोबर २०२५ | अंक २८७● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# दिवाळी गोड होणार, शेतकऱ्यांना पीएम किसानचे २००० रुपये मिळण्यास सुरुवात

### पीएम किसान योजनेसाठी नोंदणी कशी करायची ?

पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी जवळच्या CSC केंद्रात किंवा ऑनलाईन पोर्टलवरून https://pmkisan.gov.in/ या वेबसाईटला भेट द्या. तिथे अर्ज करा आणि आधार कार्ड, जमिनीचा 7/12 उतारा, बँक खाते क्रमांक, मोबाइल नंबर आणि इतर माहिती भरा आणि केवायसी करा. यानंतर तुम्हाला या योजनेचे पैसे मिळण्यास सुरुवात होईल.

त्यामुळे, जवळपास हेक्टरी साडेतीन लाख रुपये मदत शेतक-यांना मिळणार आहे. नुकसान भरपाईसाठी असलेली २ हेक्टरची मर्यादा ३ हेक्टर पर्यंत वाढवण्यात आल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या 21 व्या हप्त्याच्या वितरणाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे. केंद्र सरकारने आतापर्यंत PM किसानची 2000 रुपये ही रक्कम पंजाब, हिमाचल प्रदेश आणि हरियाणामधील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली आहे. आता ती आगामी काळात इतरही राज्यांतील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. पीएम किसानची रक्कम आतापर्यंत पंजाब, हिमाचल प्रदेश आणि हरियाणामधील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. तसेच जम्मू आणि काश्मीरमधील शेतकऱ्यांच्या खात्यातही या योजनेचे पैसे जमा व्हायला सुरुवात झाली आहे. त्यानंतर आता उर्वरित राज्यांमधील शेतकऱ्यांनाही दिवाळीपूर्वी या योजनेचे



पैसे देण्याची सरकारची योजना असल्याची माहिती समोर आली आहे.

वार्षिक 6 हजारांची मदत

केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना वार्षिक 6 हजारांची मदत केली जाते. ही रक्कम प्रत्येक 4 महिन्यांनी 2-2 हजार या प्रमाणे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाते. शेतकऱ्यांना या मदतीच्या माध्यमातून सक्षम करण्याची सरकारची योजना आहे. आता दिवाळीपूर्वी राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात या योजनेचे पैसे जमा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आगामी पिकांची तयारी करण्यासाठी फायदा होणार आहे. शेतकऱ्यांना ई-केवायसी करण्याचे आवाहनपीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी सरकारने सर्व शेतकऱ्यांना ई-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. शेतकरी pmkisan.gov.in ला भेट देऊन त्यांच्या ई-केवायसीचे अपडेट पाहू शकतात. आगामी काळात इतरही शेतकऱ्यांना या योजनेत सामील करण्याची सरकारची योजना आहे. त्यामुळे आगामी काळात जे शेतकरी या योजनेपासून वंचित आहेत त्यांनाही याचा लाभ मिळणार आहे.

## महावीर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींनी द वर्ल्ड वाईल्ड विस्डम क्विझ स्पर्धेमध्ये केले बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व

कडा (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल या सी बी एस ई बोर्ड मान्यताप्राप्त शाळेच्या विद्यार्थीनी राजनंदिनी सीताराम जाधव इ - ९ वी आणि स्तुती दिपेश गांधी इ - ८ वी या दोन विद्यार्थिनींनी युनेस्कोच्या सहकार्याने स्विस वाईल्ड फंड इंडिया या वन्यजीव संरक्षण स्वयंसेवी संस्थेने आयोजित केलेल्या द वर्ल्ड वाईल्ड विस्डम क्विझ स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले.वर्ल्ड वाईल्ड फंड फॉर नेचर ही संस्था नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन




करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता,कल्पकता, सर्जनशीलता वाढवण्यासाठी काम करणारी जगातील सर्वोत्तम संस्था आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे गट तयार करणे ,पर्यावरणावर आधारित मासिके वाचणे, वन्यजीव आधारित माहितीपट पाहणे,कीटक आणि लहान पशु-पक्षाचे निरीक्षण करणे,परिसर भेटीचे आयोजन करणे, विविध कार्यशाळा,प्रश्नमंजुषा, चर्चासत्राचे आयोजन करणे अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन यामध्ये करण्यात येते.या सर्व उपक्रमांमध्ये त्यांना विज्ञान विषयाच्या शिक्षिका श्रीमती स्वाती सारूक यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरी बद्दल संस्थेचे अध्यक्ष- श्री अमितजी राठोड, उपाध्यक्ष- श्री. संदिपजी चानोदीया, सचिव - श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष- श्री डॉ. प्रमोदजी भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री मनीषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री. अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री. संतोषजी गांधी, मुख्याध्यापक - श्री अभिलाष के. के,सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अवयव दान, देहदान प्रचार व प्रसार जनजागृती मोहीम . वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका यांच्या उपस्थित कार्यक्रम


बीड प्रतिनिधी दिनांक,६ आक्टोबर २०२५ ला उप जिल्हा रूग्णालय वरोरा,जि.एम.आर . कंपनी, वर लक्ष्मी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २ आक्टोबर ते ८ आक्टोबर हा सप्ताह दान उत्सव आयोजित केला आहे. त्यापैकी दिनांक ६ आक्टोबर २०२५ ला डोंगरगाव रेल्वे येथे दान उत्सवाचा कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमाला वंदना विनोद बरडे सहायक अधीसेवीका ऊप जिल्हा रूग्णालय वरोरा यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले.कार्यक्रमाला व्यासपीठावर गावच्या प्रथम नागरिक ईंदुताई खिरटकर, वंदना विनोद बरडे सामाजिक कार्यकर्त्या, ताराचंद खिरटकर,जी.एम.आर.विवेक ढोके



कंपनिचे मॉनेजर, बालक्रुण्णन हरी, शंकर यादव,ऊपस्थीतीत होते.प्रथमत: वंदना विनोद बरडे यांनी तुकडोजी महाराजांच्या फोटोचे पुजन, दिपप्रज्वलन सर्वांनी केले कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.वंदना विनोद बरडे अधीसेवीका यांनी अवयव दानाची माहीती व शपथ दिली त्याचा प्रचार प्रसार व जनजागृती करून अवयवदान, देहदान करण्याचे आवाहन केले सोबत अवयव दाना विषयी किंवा कुठल्याही दाना विषयीचे फायदे तोटे व समज गैरसमज समजावून सांगितले.नंतर ताराचंद खिरटकर उपसरपंच यांनी जनजागृती पर माहीती सांगितली. सूत्रसंचालन संध्या माकोडे यांनी केले.आभार प्रदर्शन सचिव सोनार मॉडम यांनी केले. कार्यक्रमाला मनोज पाल आय.सि.टि.सी. कौन्सिंलर,पुनम धांडे सिकलसेल टेक्निशियन उपस्थित होते

## आ.धस यांनी केलेल्या मागणीला मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदील खरडून गेलेल्या जमिनींसाठी हेक्टरी 3 लाख ४७ हजार रु.मिळणार

आष्टी । प्रतिनिधी मराठवाडाभूषण लोकनेते आ.सुरेश अण्णा धस यांच्या शेतकरी हिताच्या लढ्याला सलाम करावा असा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळाने घेतला आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. मातीतून उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यांचे जीवन अक्षरशः उद्ध्वस्त झाले. या संकटाकडे पाहून लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी राज्यात सर्वप्रथम पुढाकार घेऊन, अशा जमिनींना ङ्कङ्कमनरेगाङ्कङ्क योजनेत समाविष्ट करून शेतकऱ्यांना मदत देण्याची ठोस आणि व्यवहार्य मागणी मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती.या ऐतिहासिक आणि शेतकरीहिताच्या मागणीची मुख्यमंत्री महोदयांनी दखल घेत मनरेगा



योजनेतून हेक्टरी ₹३ लाख आणि राज्य शासनाकडून अतिरिक्त ₹४७ हजार, अशा एकूण ₹३ लाख ४७ हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. हा निर्णय म्हणजे खरडून गेलेल्या जमिनींना पुनर्जीवन देणारा दिलासा ठरणार आहे. याशिवाय, च्या विद्यमान दोन हेक्टर मर्यादेच्या पुढे जाऊन मुख्यमंत्री महोदयांनी तीन हेक्टर क्षेत्रपर्यंतच्या शेतजमिनींना मदतीस पात्र करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कडी, सीना, सिंदफणा, मांजरा आणि राज्यातील इतर छोट्या-मोठ्या नदी खोऱ्यांतील शेतकरी वर्गाला थेट लाभ होणार आहे. तसेच, बुजलेल्या विहिरींमधील गाळ काढण्यासाठी ₹३० हजार रुपयांची विशेष तरतूद, शेतीपयोगी जलस्रोत पुनर्संचयित करण्यासाठी केली गेली आहे. या सर्व उपाययोजनांसाठी शासनाने एकूण ₹३१६२८ कोटी रुपयांचे भरीव पॅकेज जाहीर केले आहे जे मागील काही वर्षांतील सर्वांत मोठं शेतकरीहिताचं पॅकेज मानलं जात आहे. शेतकऱ्यांच्या समस्येकडे दूरदृष्टीने पाहून, त्यासाठी राज्याच्या सर्वोच्च पातळीवर आवाज उठवून ठोस निर्णय घडवून आणणारे आ. सुरेश आण्णा धस हे खरं तर कष्टकरी समाजाचे खरे प्रतिनिधी आहेत. नेहमीच गोरगरिबांच्या प्रति मदत ची भावना घेऊनच आपल्या राजकीय वाटचालीमध्ये आमदार सुरेश धस यांचे कार्य सुरू आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे केवळ शिरूर (कासार) मतदारसंघातीलच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांच्या दु:खाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे तर कृतीने पाहणारा नेता म्हणजेच लोकनेते सुरेश अण्णा धस त्यांच्या या प्रयत्नाबद्दल कष्टकरी समाजमन, शेतकरी वर्ग आणि जनतेच्या मनात प्रचंड कृतज्ञता व्यक्त होत आहे.

## भाजपा सामान्य कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेणारा पक्ष –बाळकृष्ण कदम

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : भाजपाचे कट्टर कार्यकर्ते, सर्वसामान्य कुटुंबातील, पक्षनिष्ठ, एकनिष्ठ, भाजपाचा वैचारिक वारसा जपणारे व भाजपा कार्यकर्त्यांमध्ये आपल्या कार्याची दखल सदैव घेतली जाईल हा संदेश देण्यासाठी बाळकृष्ण कदम यांनी किनवट नगर परिषदेतील प्रभाग क्र. 02 सर्वसाधारण गटातुन मला उमेदवारी द्यावी अशी विनंती केली आहे.

गेल्या दोन दशकापासून भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ व कट्टर कार्यकर्ते म्हणून सर्वश्रुत असलेले बाळकृष्ण कदम यांनी पक्षाच्या घोडदोडीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. या कार्यकाळामध्ये त्यांनी अनेक चढ - उतार बघितले परंतु पक्षाचे



काम सोडले नाही. पक्षाकडून कोणती अपेक्षा न ठेवता सतत काम केलेले आहे. कदम यांवर अनेक वर्षे तालुका प्रसिद्धीप्रमुख पदांची जबाबदारी होती. त्यांनी पक्ष वाढीच्या सदस्य नोंदणी अभियान, सीएम चषक, गावचलो अभियान, भाजपा बुथ संपर्क अभियान तालुका संयोजक, बुथ सशक्तिकरण अभियान संयोजक, मन कि बात, बांधकाम कामगारांच्या नोंदी, देवा भाऊ यांच्या वाढदिवसा निमित्त महा रक्तदान, मोदीजींच्या वाढदिवसा निमित्त सेवा पंधरवडा, स्वच्छता अभियान कार्यक्रम अशा पक्षाच्या विविध अभियानामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला असून पक्ष वाढीसाठी त्यांचे काम अतिशय चांगले आहे. तेव्हा माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील पक्षनिष्ठ, एकनिष्ठ, भाजपाच्या वैचारिक वारसा जपणारे, भाजपा कट्टर कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी पक्षाने मला संधी दिल्यास मी पूर्ण ताकदीने प्रभाग क्रं 2 मधून निवडणुक लढणार असाल्याचा निर्धार व्यक्त केला असून मला सेवेची संधी द्यावी अशी विनंती केली आहे.

## आज बीड शहर पोलीस स्टेशन हद्दीतील शाळा कॉलेज ,व कॉफी सेंटर येथे गोंधळ व विनाकारण थांबणारे मुलांवर कार्यवाही केली.



बीड (प्रतिनिधी) बीड शहरातील शाळा,कॉलेज आणि कॉफी सेंटर परिसरात विनाकारण गोंधळ घालणारे व टवाळक्या करणाऱ्या १४ तरुणांवर पोलिसांनी कारवाई केली आहे.बीड शहर ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या आदेशानुसार पोलिसांच्या टीमने ही कारवाई केली. परिसरात टवाळक्या करणाऱ्या १४ तरुणांना ताब्यात घेऊन पोलिसांनी त्यांना समज देण्यात आला.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तसेच शैक्षणिक वातावरण अबाधित ठेवण्यासाठी ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

बीड शहरातील शाळा,कॉलेज,क्लासेस व कॉफी सेंटर परिसरात विनाकारण गोंधळ घालणारे आणि टवाळक्या करणाऱ्यांवर पोलिसांचा विशेष लक्ष असून रस्त्यावर धिंगाणा, मस्ती करणाऱ्या टवाळखोरावर कारवाई करण्यात येईल असे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी सांगितले.

## वडवणीचे समुद्र विज्ञान शास्त्रज्ञ डॉ. विलास फरताडे यांचा सत्कार संपन्न

वडवणी,दि.७(प्रतिनिधी):- वडवणी येथील रहिवासी असणारे व सध्या गोवा राज्यामध्ये समुद्र विज्ञान संशोधन शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असलेले डॉ.विलास भागवत फरताडे यांना नुकतीच चीन सरकारच्या चायनीज अकॅडमी ऑफ सायन्सेस यांच्याकडून प्रतिष्ठित पोस्ट डॉक्टराल फेलोशिप मिळाली आहे. त्यांच्या पुढील संशोधनासाठी त्यांची दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्थेत निवड झाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर अशाप्रकारे सर्वोच्च यश गाठणारे डॉ.विलास फरताडे हे बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील एकमेव असावेत. त्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीबध्दल त्यांचा सोमवारी वडवणी येथे मित्र परिवाराच्या वतीने गौरव सत्कार करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ.विलास फरताडे यांना नुकतीच गोव्याच्या सीएसआयआर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी येथून डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आलेली आहे. दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्था ही आशियातील एक अग्रगण्य सागरी संशोधन संस्था आहे. येथे आधुनिक प्रयोगशाळा प्रवाळ संवर्धनासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि बहूविषयक संशोधन सुविधा उपलब्ध आहेत. ही संस्था सागरी जीवनाचे संरक्षण व अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळखली जाते. डॉ.विलास फरताडे यांचे संशोधन प्रवाळांच्या आरोग्यावर केंद्रित आहे. प्रवाळ हे किनाऱ्यांना नैसर्गिक संरक्षण देतात. वादळ आणि लाटांपासून त्यांना सुरक्षित ठेवतात. समुद्रातील हवामान संतुलित ठेवतात आणि माणसांच्या जीवनासाठी आवश्यक सागरी संसाधन टिकवतात. जर प्रवाळच नष्ट झाले तर पाणी, हवामान आणि माणसाच्या रोजच्या उपजीविकेवर यांचा गंभीर परिणाम हा होवू शकतो. आज हवामान बदल आणि प्रदूषण यासारख्या कारणांमुळे प्रवाळ हे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जो मानवी जीवनासाठी सर्वात मोठा धोकादायक इशारा आहे. डॉ.विलास फरताडे याच प्रवाळांवरील ताण लवकर ओळखण्यासाठी नविन पध्दत विकसीत करत आहेत. मागील अनेक काळापासून यावर त्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास सुरु असून संशोधन केले जात आहे. या पध्दतीमुळे प्रवाळभित्ती वाचवण्यासाठी वेळेत उपाययोजना करता येतील आणि समुद्री परिसंस्था तसेच मानवी उपजीविका सुरक्षित राहतील. दरम्यान या प्रकल्पामुळे भारत-चीन दरम्यान सागरी विज्ञानातील संशोधनाला नवे बळ मिळणार असून प्रवाळ संवर्धनाच्या नवकल्पनांना जागतिक स्तरावर चालना मिळणार आहे. ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि भारत देशासाठी मोठी अभिमानाची बाब असणार आहे. डॉ.विलास फरताडे यांच्या या यशाबध्दल त्यांचे दि.६ ऑक्टोबर २०२५ सोमवार रोजी स्वस्तिक ज्वेलर्स याठिकाणी मित्र परिवार यांच्या वतीने गौरव सत्कार करण्यात आला. यាप्रसंगी चंद्रकांत आप्पा जैन, भागवतराव फरताडे, अर्जुन जाधव, माने मामा, नितीन जैन, दिपक जैन, डॉ.शंकर वाघ, ज्ञानेश्वर वाव्हळ, शहादेव लोंढे, सचिन काटे, अशोक बहिरे, निलेश जैन, प्रा.ओमप्रकाश जाधव, संदिप शिंदे, विनोद गार्डी, वैजनाथ तोगे, तेजस सदरे, वसूवैभव जाधव, यांसह आदींनी अभिनंदन करुन त्यांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक **लोकआरंभ** लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ९ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



**सं पा द की य**

## केव्हा काय खावे ? रामदेव बाबांनी दिला आहाराबाबतचा आयुर्वेदीक सल्ला




नेहमी जेवण योग्य प्रकारे आणि योग्य वेळी खाण्याचा सल्ला दिला जात असतो. यामुळे न केवळ आपल्या शरीराला एनर्जी मिळतेच तर आपली फिजिकल आणि मेंटल हेल्थ देखील चांगली रहाते. नेहमीच सकस आणि हलका आहार घ्यायला हवा. परंतू तो योग्य प्रकारे सेवन करणेही खूपच आवश्यक असते. जेव्हा आपण योग्य कॉम्बिनेशनवर जेवण खाऊ लागलो तर यामुळे डायझेशन चांगले होते. आणि शरीरात सगळे पोषक घटक शोषले जातात. परंतू आपण चवीसाठी कोणत्याही वेळेत काहीही खातो चुकीचे कॉम्बिनेशन घेतो. आणि त्यामुळे आरोग्यावर वाईट परिणाम होतो. यामुळे गॅस, कब्ज आणि एसिडिटीची समस्या होऊ शकते.

योगगुरु आणि पतंजलीचे संस्थापक बाबा रामदेव यांनी त्यांच्या युट्युबवर एक व्हिडीओ शेअर केला आहे.त्यात त्यांनी आहाराबाबत माहिती दिली आहे.त्यांनी सांगितले की व्यक्तीला ऋतभुक, हितभुक आणि मितभुक व्हायला हवे. आयुर्वेदात वेग-वेगळ्या हवामानात वेग-वेगळा आहार करण्याचे म्हटले आहे. वात, पित्त आणि कफ यानुसार आपल्या शरीराच्या प्रकृतीनुसार भोजन करावे. बॅलन्स आणि अल्पाहारी असावे.

दूध आणि दहीचे सेवन केव्हा करावे ?

बाबा रामदेव यांच्या व्हिडीओत त्यांनी सांगितले की जेवणानंतर एक तासांनी पाणी प्यावे. सकाळी दही, दुपारी ताक आणि रात्री जेवल्यानंतर एक तासांनी दूध प्यायला हवे. जेवणानंतर लगेच दूध पिऊ नये. दूधासोबत मीठाचा कोणताही पदार्थ नसावा, त्यामुळे त्वचेचे आजार होऊ शकतात. रात्रीचे दही आणि ताक घेऊ नये. दही खाल्ल्यानंतर रात्री लोक खीर खातात, परंतू हे योग्य नाही. दूधाचा सोबत आंबट फळे खाऊ नयेत. विरुद्ध आहार म्हणजे जेवणातील चुकीच्या कॉम्बिनेशनमुळे त्वचेचे आजार, इम्युनिटी कमजोर होणे आणि वात, पित्त सारखे दोष वाढू शकतो.टरबूज किंवा कलिंगड दूधासोबत कधीच खाऊ नये. याशिवाय हे खाल्ल्यानंतर लगेच पाणी देखील पिऊ नये.यामुळे गंभीर समस्या निर्माण होऊ शकते.कारण यामुळे शरीरात रिएक्शन होऊ शकते. या लहान बाबींची काळजी घ्यायाला हवी. असे चुकीचा आहार घेतल्याने अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.कच्चे आणि शिजवलेले अन्न एकत्र खाऊ नये.परंतू यामुळे जास्त त्रास होत नाही. जास्तीत जास्त आहार कच्चा आणि मोड आलेला असावा. जे अंकुरीत आहार घेतात त्यांच्या शरीरात टॉक्सिन्स होत नाहीत. रोज सकाळी मोड आलेले कडधान्य खावीत. जर जमत नसेल तर आठवड्यातून एकदा तरी हे खावे. पहिल्यादा सलाड आणि फळे खावीत आणि त्यानंतर भोजन करावे,शेवटी गोड पदार्थ खीर किंवा हलवा खाऊ शकता. हलका आहार आधी, नंतर मध्यम आणि जड आहार शेवटी घ्यावा.हिरव्या पाले भाज्या आणि आंवळा उकडून खाऊ नये. कारण विटामिन्स सी आणि अनेक पोषक घटक उकडल्याने निघून जातात. सलाड आणि मोड आलेले कडधान्य न उकडता खावीत. शिजलेला कमी बल्की, कच्चाहार फलाहार आणि रसाहार अधिक खायला हवा. कारण हा सात्विक आहार असतो.

# विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत सिद्धेश्वर महाविद्यालयाचे सुयश

माजलगाव प्रतिनिधीदिनांक 22 सप्टेंबर 2025 येथील भा.शि. प्र.संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाने विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेत रसायनशास्त्र विभागातील प्रा. अक्षय जगताप यांनी प्राध्यापक संशोधकांमधून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. तर या विभागाची विद्यार्थिनी कु. मोहिनी चंद्रशेखर पायघन हिने रसायनशास्त्र विभागातील प्रा. अक्षय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली "हायब्रीड रिनीव्हेबल चार्जिंग स्टेशन्स पावर्ड बाय स्मार्ट एनर्जी



पोल्स फॉर झिरो कार्बन इमिशन" या विषयावरती हा प्रकल्प सादर केला. संशोधन क्षेत्रातील नाविन्यामुळे या सादरीकरणास कु. मोहिनी चंद्रशेखर पायघन या विद्यार्थिनीस तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या नावीन्यपूर्ण प्रकल्पाला रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास बोरगावकर, डॉ. संजय पवार यांनी योग्य दिशा दाखवत संशोधन वृत्ती विकसित केली. प्रा अक्षय जगताप आणि कु. मोहिनी चंद्रशेखर पायघन या दोघांचेही अभिनंदन भा.शि. प्र.संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्ष ज्योतीताई ठाकूर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, स्थानिक कार्यवाह ऍड. विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. या विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेमधून प्रा. अक्षय जगताप व कु. मोहिनी पायघन हिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

# राष्ट्र सैनिकांच्या हाती उमापूरच्या जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांची शुभेच्छा पत्रे

उमापूर, दि. २१ (लोक इच्छा न्युज):- येत्या १ नोव्हेंबर पासून देशभरात दिव्यांचा सण म्हणून ओळखल्या जाणार्या दिवाळीला सुरुवात होणार आहे. त्यामुळे सर्वत्र आनंदाचे, उत्साहाचे वातावरण दिसून येणार आहे. अशातच देशाच्या सीमेवर राहन आपल्या सर्वांचे रक्षण करणार्या भारतीय सैनिकांच्या प्रति आभार व्यक्त करत त्यांना सुद्धा शुभेच्छा देण्याचे कर्तव्य उमापूर येथील जि.प.माध्य. शाळा, प्राथमिक कण्या, उर्दू प्राथमिक च्या २४६ विद्यार्थ्यांनी दिपावलीच्या शुभेच्छा पत्रीकेद्वारे सिमेवरील सैनिकांना पाठवले आहे. सर्वत्र दिवाळीची धामधुम सुरु असताना, ज्यांच्या अमुल्य त्याग, देशरक्षणामुळे आपण दिवाळी आनंदात साजरी करु शकतो अशा भारतीय सैनिकांना उमापूरच्या जिल्हा परिषद



शाळेच्या चिमुकल्यानी पत्राद्वारे दिपावली शुभेच्छा सन्देश व आपल्या भावना पत्राद्वारे व्यक्त केल्या आहे यामध्ये आकाश कंदील निर्मिती करणे, ग्रंथालयाची स्थापना करणे, माती शिल्प प्रशिक्षण, घरनिर्मिती कार्यशाळा, आनंदनगरी, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा अशा विविध उपक्रमात विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग असतो यावेळी शाळेचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त भगवान फुंदे यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.अतिशय



वैशिष्टयपूर्ण ग्रामीण स्तरावरील जिल्हा परिषद सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांची कलाकृती राष्ट्रउभारणीतील राष्ट्र सैनिकांच्या प्रत्यक्ष हाती असणार आहे. ग्रिटींग कार्ड नवनिर्मिती" हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत सर्जनशील आणि आनंददायी असतो. या उपक्रमातून विद्यार्थी आपली कल्पकता, सौंदर्यदृष्टी आणि भावनांची अभिव्यक्ती विकसित करू शकतात. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता वाढवणे हस्तकौशल्य विकसित करणे, रंगसंगती, रचना आणि लेखनकौशल्य वाढवणे शुभेच्छा देण्याच्या संस्कारांची जाणीव करून देणे विद्यार्थ्यांनी या साहित्याद्वारे नवनिर्मिती केली आहे. विशेष सर्वांना मानांकनाचे प्रमाणपत्रही लाभणार आहे. या सर्व कार्यात माझ तिनही प्रशालेतील मुख्याध्यापक, शिक्षक सर्वांनी प्रयत्न केले विद्यार्थ्यांनी केलेली तयारी प्रचंड नवनिर्मिती उत्साहवर्धक कल्पनेला सलाम करावे असेच कार्य आहे असे मत उपक्रम राबवीणारे भगवान फुंदे यांनी व्यक्त केले.

## मी मराठी.. माझी मराठी

लाभले भाग्य आम्हा बोलतो मराठी.. हो मराठी भाषकांचं राज्य आणि त्यातली भाषा मराठी' अणि त्याला मिळालेला अभिजात दर्जा या सा-यांचा आपल्यातील प्रत्येकाला अभिमान आहे आणि आता याचा अधिक उत्कर्ष व्हावा यासाठी शासनस्तरांवर देखील मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे.

मुंबई-पुणे सारख्या शहरात शिकलेली मुले ही ग्रामीण भागात शिकलेल्या मुलांपेक्षा सरस ठरतात असं नाही परंतु आपलाकडे इंग्रजीचं जास्त कौतुक झालं आणि इंग्रजी बोलण्यात मेट्रो शहरातील मुले अग्रेसर असल्याने ग्रामीण महाराष्ट्रातील मुलांमध्ये न्यूनगंड अधिक आहे. आणि हाच दूर करण्याचे काम प्राधान्याने मराठीचा वापर वाढविल्याने होणार आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतला जाणाऱ्या भारतीय प्रशासन सेवा अर्थात आयएएस मध्ये देखील मराठी माध्यमाचा समावेश करण्यात आला आहे. आपण ती परिक्षा तसेच मुलाखत यासाठी मराठी भाषेचा पर्याय निवडावा हे उत्तम.

नाना पाटेकरचं एक वाक्य आहे. मला स्वप्न मराठीत पडतात तर मराठीच जवळची त्याप्रमाणे आपली मातृभाषा आपण सर्वत्र वापरावी यातून आपला आत्मविश्वास वाढीला लागेल आणि आपण कोणत्याही क्षेत्रात बाजी मारू शकतो याचीही खात्री बाळगता येईल.

अमृतातेही पैजा जिंके अशी आपली मराठी काळानारुप बदलत आली आहे. इंग्रजीचं कौतूक करणारे देखील कबूल करतील की ऑक्सफर्ड आपल्या शब्दकोषात इतर भाषेचे शब्द स्विकारतो त्यावेळी त्यात मराठीला प्राधान्य आहे. आणि मराठीचे मोठेपण असे की आपणही इतर भाषेतील शब्द मोठया प्रमाणात स्विकारतो अहे की आपणही इतर भाषेतील शब्द मोठ्या प्रमाणात स्विकारतो आणि त्याचा वापर करतो. याने उत्क्रांत होणारी मराठी भाषा दिवसेंदिवस अधिक संपन्न होत आहे.

समाजमाध्यमांमध्ये देखील आज मराठीचा सर्वाधिक वापर होतो याचा आपणास अभिमान हवा आणि इंग्रजी शब्दात मराठीचं वेगळेपण मान्य आपल्यातील प्रत्येकाने याचा वापर वाढवला तर मराठीचा प्रचार वेगाने होईल.

**प्रशांत दैठणकर**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**बीड**

# मुख्याध्यापक गणेश वाघ यांना पितृशोक!

## संपादक तथा संस्थाचालक गोविंदराव वाघ यांचे निधन; शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार!


बीड दि.८(प्रतिनिधी) - शहरातील धांडे गल्ली येथील मूळ व सध्या यशवंत नगर भागातील रहिवासी असलेले साप्ताहिक कंकालेश्वर समाचारचे संपादक तथा शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव दादाराव वाघ यांचे अल्पशा आजाराने आज बुधवार दिनांक 8 ऑक्टोबर2025 रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले. निधना समय त्यांचे वय 77 वर्ष होते. सायंकाळी 07: 30 वाजण्याच्या सुमारास संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या मागे असलेल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

बीड शहरातील यशवंत नगर भागात रहिवासी असलेले साप्ताहिक कंकालेश्वर समाचारचे संपादक तथा शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव दादाराव वाघ सर हे मागील काही दिवसापासून आजारी होते. परवा सोमवार रोजी अचानक त्रास होऊ लागल्याने त्यांना शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना बुधवार दिनांक 08 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 03 वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राण ज्योत मालवली. श्री गोविंदराव वाघ सर यांना बीड आणि परिसरात 'नाना' या नावाने ओळखले जात होते. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात नानांचे उल्लेखनीय काम होते. शिक्षक म्हणून नोकरी करत असतानाच नानानीं स्वतःच्या मुलांना उच्चशिक्षित केले आज त्यांची सर्व मुले शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या बरोबर नानांनी शिवाय सर्व समाज घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेण्यासाठी स्वकर्तुत्वाने समाज उपयोगी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. सायंकाळी 7:30 वाजता त्यांच्या पार्थिवावर संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या मागे असलेल्या स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी बीड शहरासह जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रासह विविध पक्षाचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी डॉक्टर, इंजिनिअर, वकील, संस्थाचालक मुख्याध्यापक, शिक्षक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री गोविंदराव वाघ यांच्या पश्चात पत्नी सुदामतीताई वाघ तिन मुले गणेश वाघ, नामदेव वाघ, दत्तात्रय वाघ, तीन सुना, एक मुलगी, जावाई, दोन बहिणी, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# उच्च न्यायालय यांना सेवेत असलेल्या शिक्षकांना TET सक्तीची अट रद्द करण्याची कादरी शाहेद यांची मागणी

नवी दिल्ली, ८ ऑक्टोबर २०२५: महाराष्ट्रातील हजारो प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांच्या वतीने क्रांतिकारी शिक्षक संघटनाने सर्वोच्च न्यायालयाकडे विनंती केली आहे की, सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (T.E.T.) उत्तीर्ण होण्याची सक्तीची अट लागू करू नये. संघटनेने सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे की, १८ जून १९८३ ते २२ ऑगस्ट २०१३ दरम्यान सरकारच्या नियमांनुसार व प्रक्रियेप्रमाणे शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. त्या काळात शिक्षक पात्रता परीक्षा (T.E.T.) आवश्यक नव्हती आणि या नियुक्त्या कायदेशीर व वैध मानल्या गेल्या होत्या.




पत्रात म्हटले आहे की, अनेक शिक्षकांनी २० ते २५ वर्षांहून अधिक काळ निष्ठेने सेवा बजावली आहे. अशा अनुभवी शिक्षकांना आता पुन्हा T.E.T. उत्तीर्ण होण्यास भाग पाडणे अन्यायकारक, अव्यवहार्य आणि असुरक्षितता निर्माण करणारे आहे.

संघटनेने स्पष्ट केले आहे की, T.E.T. ची अट नव्याने शिक्षक व्यवसायात प्रवेश घेणाऱ्यांसाठी लागू करणे योग्य आहे; परंतु दशकानुदशके सेवा बजावणाऱ्या शिक्षकांना या परीक्षेतून सूट देणे आवश्यक आहे. अनुभव, अध्यापन कौशल्य आणि वर्गातील कामगिरी हीच शिक्षकाच्या पात्रतेची खरी मोजमापे आहेत, असे संघटनेचे म्हणणे आहे. संघटनेने १ सप्टेंबर २०२५ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची आणि सर्व कार्यरत शिक्षकांना T.E.T. मधून सूट देण्याची मागणी केली आहे. ही विनंती संघटनेचे संस्थापक सचिव कादरी शाहेद यांनी केली असून, न्यायालय शिक्षक वर्गाला योग्य न्याय देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ९ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## RBI: महाराष्ट्रातील 'या' बँकेवर मोठी कारवाई, RBI ने लादले निर्बंध,




सोलापुरातील समर्थ सहकारी बँकेला रिझर्व्ह बँकेने मोठा दणका दिला आहे. आरबीआयने बँकिंग नियमन अधिनियम 1949च्या कलम 35(अ) आणि 56 नुसार सहा महिन्यांसाठी बँकेच्या व्यवहारवर निर्बंध घातले आहेत. त्यामुळे आता समर्थ सहकारी बँकेला आरबीआयच्या पूर्व परवानगीशिवाय नवीन कर्ज देता येणार नाही, तसेच ठेवीही स्वीकारता येणार नाहीत. त्याबरोबर ठेवीदारांना आपल्या खात्यातून पैसेही काढता येणार नाहीत. यामुळे बँकेच्या ग्राहकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्राहक चिंतेत

समर्थ बँकेवरील या कारवाईमुळे ठेवीदारांची चिंता वाढली आहे. आज सकाळपासून ठेवीदार बँकेत गोंधळ घालत आहेत. किरण मोहिते या निवृत्त मुख्याध्यापिका असून त्यांची पेन्शन बँकेत जमा होते. जमा झालेल्या पेन्शन वरच त्यांच्या कुटुंबाची गुजरान आहे. मात्र कालपासून त्यांचे पैसे निघत नसल्याने त्या हतबल झाल्या आहेत. मोहिते यांनी सांगितले की, 'माझी पेन्शन स्टेट बँकेत जमा होते, मात्र मी काही लोकांना गॅरेंटेड राहिल्यामुळे त्यावर मर्यादा येत होत्या. त्यामुळे मी माझी टेन्शन माझ्या मिस्टरांच्या खात्यावर वळवली आहे. त्यांनी कालच सहा वाजता माझ्या खात्यावर 40 हजार रुपये पाठवले. पंधरा मिनिटांनी मी ते पैसे फोनपे द्वारे घर भाडे आणि इतर खर्चासाठी पाठवण्याचा प्रयत्न केला मात्र ते झाले नाहीत अशी माहिती दिली. आणखी एका व्यक्तीने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, 'माझ्या मुलीच्या नावावर 9.50 लाख रुपये मी ठेवले होते. तसेच 80 हजार रुपये चालू खात्यात होते. आता बँकेने बाहेर बोर्ड लावला आहे की सभासद आणि हितचिंतकांनी सहकार्य करावे. आमचं म्हणणं आहे की, त्यांनी आम्हाला लेखी स्वरुपात द्यावं की एवढ्या वेळ दिवसात पैसे परत करतो. मात्र ते तसे द्यायला तयार नाहीत.'

बँकेचे अध्यक्ष दिलीप अत्रे काय म्हणाले?

या सर्व प्रकरणावर बँकेचे अध्यक्ष दिलीप अत्रे यांनी भाष्य केले आहे. त्यांनी म्हटले की, बँकेवर आरबीआयने अचानक निर्बंध लादले. आमच्या बँकेची आर्थिक स्थिती व्यवस्थित असताना देखील हे निर्बंध लादले हे आम्हाला कळले नाही. बँकेकडे 70 ते 80 कोट रुपयांची ठेव आहे. बँकेतून कोणत्याही प्रकारे कोणाही जवळच्या खातेदाराला यापूर्वी रक्कम दिले गेलेली नाही. अचानकपणे RBI ने ही कारवाई केली.

पुढे बोलताना अत्रे म्हणाले की, 'गेल्या दोन महिन्यात समर्थ सहकारी बँकेने लक्षणीय प्रगती केली आहे. यात शेअर कॅपिटल दुप्पट झालं, लिक्विडीटी 60 कोटीने वाढली, सिक्युरिटीसाठी 60 कोटी रुपये भर घातली आहे. आम्ही समर्थ सहकारी बँकेवर लावलेले निर्बंध हटवण्यासाठी पाठपुरावा करणार आहोत. बँकेच्या सभासदांना विनंती करतो की, बँकेवर विश्वास ठेवा, बँकेवरील लावलेले निर्बंध दूर करून बँक पूर्ववत करू. '

वैद्यकीय आणि इतर सेवांसाठी खातेदारांना बँकेतून रक्कम काढण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी आम्ही मेलच्या माध्यमातून आरबीआयशी संवाद साधत आहोत. याबद्दल दोन दिवसात आरबीआयकडून उत्तर येईल. काही गुंतवणूकदारांबरोबर आमचं बोलणं झालं आहे. अडीचशे ते तीनशे कोटी रूपयांची गुंतवणूक येणार आहे. त्यातील सव्वाशे कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे अशी माहितीही अत्रे यांनी दिली आहे.

# सामाजिक बांधिलकी म्हणून मदतीचा हा छोटासा प्रयत्न– एस. एम. देशमुख

माजलगाव : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आणि तलावातील पाणी सोडल्याने अनेक गावांचे मोठे नुकसान झाले. याबरोबर गोदाकाठ आणि सिंदफणा काठावरील शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झालेले आहे. अनेकांची घरे वाहून गेली. अनेकांची घरे पडली. शेतकऱ्यांची शेती नेस्तनाबूत झाली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा प्रयत्न मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने करण्यात आला. माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, डेपेगाव, सांडस चिंचोली, आळसे वाडी, गंगामसला या ठिकाणी परिषदेच्या वतीने गरजूना ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सर यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त देशमुख म्हणाले की पत्रकार हा समाजाचा घटक असतो आणि सामाजिक बांधिलकी



म्हणून आमच्याकडून जेवढे शक्य होईल तेवढे आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. मराठवाड्यामध्ये अनेक ठिकाणी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मदत करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पावसाने आणि तलावातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. अनेकांची पिके नेस्तनाबूत झाली. अनेकांची घरे पडली.सांडस चिंचोली सारख्या गावांमध्ये तर संपूर्ण गावाला पाण्याचा वेढा पडला होता.

अशा परिस्थितीत लोकांचा संपर्क तुटल्याने लोकांना वाचवणे हा मोठा प्रश्न होता. अनेकांना एनडीआरएफ च्या पथकाने बाहेर काढले. तशीच परिस्थिती देपेगाव,सांडस चिंचोलीची होती. या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात गावामध्ये पाणी घुसले आता परिस्थिती पूर्व पदावर येत असून शेतकऱ्यांना आणि ग्रामस्थांना धान्यापासून ते वस्तू पर्यंत सर्वच गोष्टीच्या मदतीची गरज आहे. अशा परिस्थितीत मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, डेपेगाव, मंजरथ ,सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला या गावांमध्ये ब्लँकेट चे वाटप करून काही प्रमाणात का होईना पूरग्रस्तांना दिलासा दिला. यावेळी बोलताना एस.एम.देशमुख म्हणाले की मराठी पत्रकार परिषदेने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे. मराठवाडा आणि सोलापूर या भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सोलापूर आणि मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये शक्य होईल तेवढी मदत देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. याच पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील या पाच गावांना ब्लँकेट चे वाटप करण्यात येत आहे. परिषदेच्या वतीने पत्रकारांचे प्रश्न तर सोडवण्यासाठी संघर्ष केला जातोच त्याबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, डिजिटल मीडियाचे राज्याचे अध्यक्ष अनिल वाघमारे, माजलगाव तालुका अध्यक्ष हरीश यादव, पत्रकार पांडुरंग उगले, धनंजय माने, सुहास बोराडे, धम्मपाल डावरे या पत्रकारांसह गावातील सरपंच, चेअरमन, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वंचित आघाडी महिलांची मोफत केवायसी करणार– बालासाहेब जगतकर

परळी (प्रतिनिधी) _ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने 10 ऑक्टोबर पासून प्रभाग क्रमांक ४ व ५ मधील भीमनगर, साठेनगर, रमान नगर ,प्रबुद्ध नगर, होळकर चौक, गणेशपार, बंगलागल्ली, नांदूरवेस इत्यादी भागातील लाडकी बहीण योजनेतील महिलांची मोफत केवायसी करून देण्यात येईल त्यासाठी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांनी तात्काळ केवायसी करून घ्यावी असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्ध प्रमुख तथा संपादक बालासाहेब जगतकर यांनी केले आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र बहिणींना मासिक आर्थिक सहाय्यताचा लाभ मिळवण्यासाठी केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करून घ्यावी जेणेकरून त्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होण्यास अडचणी निर्माण होणार नाही. ही केवायसी प्रक्रिया सुरुवात 18 सप्टेंबर पासून सुरुवात



झाली असून शेवटची दिनांक 18 नोव्हेंबर. असून केवायसी केल्यास दीड हजार हप्ता मिळणार आहे. केवायसी दरवर्षी करावी लागणार असून ही योजना महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पात्र लाभ मिळविण्यासाठी लाभार्थी बहिणीने विलंब न लावता जवळच्या सीएससी केंद्रावर जाऊन आपले केवायसी पूर्ण करून प्रशासनाने गाव पातळीवर प्रक्रिया पूर्ण करून घेण्यासाठी कारवाई सुरू केली यासाठी स्वतःचा आधार कार्ड पती किंवा वडिलांचे आधार कार्ड व मोबाईल नंबर उत्पन्नाचे प्रमाणपत्र बँक पासबुक इत्यादी लागणार असून वंचित बहुजन आघाडी भीमनगर परळीच्या वतीने ही दि. १० ऑक्टोबर 2025 पासून मोफत केवायसी करून लाभार्थ्यांची गैरसोय टाळण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती ही वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बालासाहेब जगतकर यांनी केले आहे.

# शिक्षणमहर्षी आदर्श शिक्षक कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या जयंती निमित्त ज्ञानकुंभ सप्ताह अंतर्गत अॅबॅकस, सॅक रेस या स्पर्धा संपन्न

## ज्ञानकुंभ सप्ताह अंतर्गत घेण्यात आलेल्या अॅबॅकस स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या तार्किक क्षमतेत वाढ

परळी ( प्रतिनिधी ) - शहरातील पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा,पद्मावती विभागात येथे परळी भूषण आदर्श शिक्षक कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या जयंती निमित्त 3 ऑक्टोबर ते 10 ऑक्टोबर दरम्यान ज्ञानकुंभ सप्ताहाचे आयोजन केले आहे. या ज्ञानकुंभ सप्ताह अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. आज सप्ताहाच्या सहावा दिवशीही विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे (अध्यक्ष, श्री पद्मावती शिक्षण संस्था) ,प्रमुख पाहुणे श्री. दिपक तांदळे (सचिव, श्री पद्मावती शिक्षण संस्था) , श्रीमती प्रेमिलाताई तांदळे मॅडम (सहसचिव पद्मावती शिक्षण संस्था), श्री.इंगळे सर (पर्यवेक्षक), दैठणकर सर यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिक्षणमहर्षी आदर्श शिक्षक कै. विठ्ठलराव तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

ज्ञानकुंभ सप्ताहाच्या सहाव्या दिवशी




पद्मावती विभाग येथे इयत्ता चौथी ते इयत्ता सातवी या गटामध्ये अॅबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तर इयत्ता बालवाडी ते तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी अॅबॅकस व सॅक रेस या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले "हा ज्ञानकुंभ सप्ताह . विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपले आयुष्य खर्ची घालणाऱ्या आदर्श शिक्षक कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या जयंतीनिमित्त ज्ञानकुंभ सप्ताह आयोजित करण्याचा उद्देश हा विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक व बौद्धिक विकास व्हावा हा दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून शाळेने विविध स्पर्धांचे आयोजन केलेले आहे. संस्कार प्राथमिक शाळा ही जिल्ह्यातील एकमेव अशी शाळा आहे की ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांना मोफत अॅबॅकस शिकवून विद्यार्थ्यांचा बौद्धिक तसेच तार्किक विकास केला जातो.अॅबॅकस शिकण्याचे फायदे म्हणजे मानसिक गणित सुधारते, एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढते, आत्मविश्वास वाढतो, आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते, अॅबॅकसमुळे मुलांच्या उजव्या मेंदूची कार्यक्षमता वाढते, ज्यामुळे त्यांची कल्पनाशक्ती (व्हिज्युअलायझेशन) आणि ऐकण्याची कौशल्ये सुधारतात. यामुळे आज विद्यार्थ्यांची अॅबॅकस लिसनिंग आणि युजिंग या दोन्ही स्पर्धा घेण्यात आल्या.


या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती. पायघन मॅडम, तर, आभार श्री. विजय क्षीरसागर सर यांनी मानले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियानासाठी

बीड दि. 08 ( जिमाका ) :-कार्यालयाने केलेल्या कामाचे मुल्यमापन होण्यासाठी व नाविन्यतापूर्ण अभियान राबविल्याचा गौरव होण्यासाठी शासनाने आपल्याला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानातुन संधी उपलब्ध करुन दिली असून या अभियानातून बक्षिस प्राप्त होण्यासाठी जास्तीत जास्त कार्यालयांनी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेश सुर्यवंशी यांनी आज राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान बैठकी प्रसंगी केले. शासन दरबारी काम करत असतांना आपल्या कोणत्याच कामाची शासनस्तरावर दखल घेतली जात नाही असा आपला सूर असतो आपल्या बुध्दी कौशल्यातुन विविध प्रकारे कार्यालयीन कामात केलेला बदल,कामाची गतिमानता, कार्यालयाचे सुशोभिकरण, कार्यालयाची अभिमुखता यातुन आपण केलेल्या कामाचा ठसा उमटविण्यासाठी शासनाने आपणास हे अभियान उपलब्ध करुन दिले असल्याचे श्री सुयंवंशी यांनी या प्रसंगी उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांना सुचित केले.या बैठकीस उपविभागीय अधिकारी कविता जाधव,तहसीलदार तेजस्वीनी जाधव विविध कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.प्रस्ताविकात अभियान व स्पर्धेशी संबधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून या पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक pragatiabhiyan. maharashtra.gov.in या लिंकवर ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत तसेच दि. 3/2/2021 च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या स्पधेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दि. 16 ते 31 ऑक्टोबर 2024 होती. या कालावधीत वाढ करुन दि. 16 ऑक्टोबर 2025 पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ दिली आहे. स्पर्धेत सहभाग घेण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी राज्यस्तरावर त्याचप्रमाणे विभागीय,महानगरपालिका व तालुका स्तरावर स्पर्धेचे अर्ज परिच्छेद 2 मध्ये नमूद केल्यानुसार दि. 16 ऑक्टोबर 2025 पर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने भरावेत. या प्रस्तावावर शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.

**जास्तीत जास्त विभागाने प्रस्ताव सादर करावेत**

मूल्यमापनासाठी वेळापत्रक • तालु का, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय समितीकडे थेट प्रवेशिका पाठविणाऱ्या कार्यालयांसाठी दि. 16 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर •तालुका स्तरावरील निवड समितीने प्रस्तावांची छाननी करुन गुणानुक्रमे तीन प्रस्ताव




जिल्हास्तरीय समितीकडे पाठविणे,दि. 1 नोव्हेंबर ते 15 नोव्हेबर •जिल्हास्तरीय निवड समित्यांनी प्रस्तावांची छाननी करुन गुणानुक्रमे तीन प्रस्ताव विभागीय निवड समितीकडे पाठविणे दि. 16 नोव्हेंबर ते 30 नोव्हेंबर. • विभागीय निवड समित्यांनी त्यांचेकडे प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन गुणानुक्रमे तीन प्रस्ताव राज्य निवड समितीकडे सादर करणे.दि. 1 डिसेंबर ते 15 डिसेंबर. राज्यस्तरीय निवड समितीने- • थेट प्राप्त प्रस्तावांतून उत्कृष्ट तीन (प्रत्येक वर्गवारीत) प्रस्तावाची निवड करणे. (मंत्रालयीन विभाग, महानगरपालिका, राज्यस्तरावरील प्रशासकीय कार्यालये व सर्व प्रकारची मुख्यालय कार्यालयाकडून प्राप्त प्रस्ताव) दि. 1 नोव्हेबर ते 15 डिसेंबर. • विभागीय स्तरावरील समितीकडून प्राप्त प्रस्तावांची गुणानुक्रमे उत्कृष्ट तीन प्रस्तावांची निवड करणे 16 डिसेंबर ते 31 जानेवारी 2026. • पारितोषिक प्राप्त प्रस्तावांचे निकाल जाहीर करणे दि. 1 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी • अभियानातंर्गत घेतलेल्या स्पर्धेच्या पारितोषिकाची रक्कम मंजूरीबाबतचे आदेश निर्गमित करण्याचा दि. 28 फेब्रुवारी 2026 पर्यंत असा आहे. वरील तारखा या फक्त मार्गदर्शनाकरिता देण्यात आलेल्या आहेत, जेणेकरुन समिती स्पर्धेतील प्रस्तावांची छाननी व मूल्यमापन वेळेत करील. मात्र एका स्तरावर काम झाल्याबरोबर दुसऱ्या स्तरावर प्रस्तावावरील तारखांच्या अगोदर प्रस्ताव पाठविता येईल. प्रस्ताव आल्यानंतर वरच्या स्तराच्या समितीने प्रस्तावांचा विचार करावा. छाननी करताना सर्व प्रस्तावांचा विचार करुन समितीने वरील तारखेच्या अगोदरच अहवाल सादर करावे. प्रस्ताव सादर करण्याचे निकष पुढीलप्रमाणे आहेत. कार्यालयीन व्यवस्थापननामध्ये आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब.सेवांची गुणवत्ता, दर्जा यामधील वाढ व उपक्रमांची परिणामकारकता. लोकभिमुख्ता. ई गव्हर्नस, संसाधनांचा पर्याप्त व प्रभावी वापर. तंटा, तक्रार मुक्त कार्यालय आणि नाविण्यपूर्ण व पथदर्शी स्वरुपाच्या संकल्पना/ प्रयोग उपक्रम राबवावे.

# ड्रायव्हरने गौतमी पाटीलला नेमकं काय सांगितलं? त्या घटनेबाबत गौतमीचा खळबळजनक खुलासा!

प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटीलच्या कारचे अपघात प्रकरण सध्या राज्यात चांगलेच गाजत आहे. गौतमीच्या कारचालकाने सामाजी मरगळे नावाच्या रिक्षाचालकाला धडक दिली होती. यात मगरळे जखमी झाले होते. याच मगरळे यांच्या मुलीच्या कुटुंबीयांनी समोर येऊन गौतमीवर अटकेची कारवाई करावी अशी मागणी केली आहे. कारमध्ये बसलेली नसतानाही नाव समोर येत असल्याने गौतमीने पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अपघातापूर्वी चालकाने गौतमी पाटीलला नेमके काय सांगितले होते? याचाही खुलासा आता गौतमीने केला आहे. तर दुसरीकडे गौतमीच्या पत्रकार परिषदेनंतर मरगळे यांच्या मुलीने समोर येत अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. आम्हाला मदत करणारा गौतमीचा भाऊ नेमका कोण होता? असा सवालच मगरळे यांच्या मुलीने केला आहे. गौतमीने नेमकं काय सांगितलं?

बऱ्याच गोष्टींवरून मला ट्रोल केलं जातं. माझ्यासाठी ट्रोलिंग नवे नाही. अपघाताच्या वेळी मी गाडीमध्ये नव्हते. त्यामुळं मला ट्रोल करणं थांबवावे यासाठीच मी आज समोर आली आहे. अपघाताची घटना मसजल्यानंतर मी माझ्या भाऊ लोकांना मदतीसाठी पाठवलं होतं. पण त्या लोकांनी नकार दिला. आता सगळं कायदेशीर चालू आहे. मी तिथं जाऊन उपयोग न्हवता. समोरून कायं उत्तर येणारं हे मला माहिती होतं. त्यामुळे मी त्या ठिकाणी गेले नाही, असे स्पष्टीकरण गौतमी पाटीलने दिले.

चालकाने गौतमीला नेमकं काय सांगितलं?

तसेच, माझे कामं चालू होते. त्यामुळे मी मुंबईला होते. मी पोलिसांना पूर्ण सहकार्य केले आहे. यापुढेही माझे पूर्ण सहकार्य राहील. पोलिसांनी कॅमेरे, मोबाईल लोकेशन सर्व चेक केले आहे. मी अपघातास्थळी असते तर जखमींकडे मी दुर्लक्ष केले नसते. आज माझं आणि माझ्यासोबतच्या कलाकारांचं पोट माझ्यावर चालतं. माझे काम बंद झाले तर याचा खूप लोकांवर परिणाम होईल. चालकाने मला फक्त मी देवाला चाललो आहे असे सांगितले. त्यापुढे मला त्याने काहीही माहिती नाही, असा खुलासाही गौतमीने केला मग मी त्यांना का भेटायला जाऊ?




त्यांनी मदतीचा हात नाकारला. आम्ही आता कायदेशीर मार्गाने पुढे जाऊ असे ते म्हणाले. त्यामुळे आता मी कायदेशीर मार्गाने चालले आहे. ते माझी बदनामी करतायत. मग मी त्यांना का भेटायला जाऊ. अपघातानंतर मी चालकाशी बोललेले नाही. चालकाचं आणि माझं अजूनपर्यंत बोलण झालेलं नाही, असेही गौतमीने स्पष्ट केले.

# माजलगाव नगरपालिकेचे प्रभाग निहाय आरक्षण जाहीर!

माजलगाव प्रतिनिधी:नगरपालिकेत नगरसेवक होवू इच्छिणाऱ्यांना आता कामाला लागण्याची वेळ आली आहे माजलगाव नगरपालिकांचे प्रभागनिहाय आरक्षण ८ऑक्टोंबर बुधवारी जाहीर झाल्यानंतर काही ठिकाणी इच्छूकांचा हिरमोड झाला असला तरी खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या कामाला लागण्याची वेळ आता सुरू झाली आहे माजलगाव तहसिलदार संतोष रुईकर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पोपट निगळ यांच्या नियंत्रणाखाली नगरपालिकेच्या कक्षात माजलगाव नगरपालिकेच्या १३ वार्डातील आरक्षण दिनांक ८ऑक्टोंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आले आहे नगरपरिषद चे १३ वार्डातुन २६ नगरसेवक मतदार निवडणार आहे माजलगाव नगरपालिकेचे असे असेल आरक्षण प्रभाग क्र.१(अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला,(ब) सर्वसाधारण प्रभाग क्र.२ (अ) अनुसूचित जाती महिला, (ब) सर्वसाधारण प्रभाग क्र.३ (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग, (ब) सर्वसाधारण महिला प्रभाग क्र.४ (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग, (ब) सर्वसाधारण महिला प्रभाग क्र.५ (अ) सर्वसाधारण महिला, (ब) सर्वसाधारण प्रभाग क्र.६ (अ) सर्वसाधारण महिला, (ब) सर्वसाधारण प्रभाग क्र.७ (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला, (ब) सर्वसाधारण प्रभाग क्र. ८ (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला, (ब) सर्वसाधारण प्रभाग क्र.९ (अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग, (ब) सर्वसाधारण महिला प्रभाग क्र.१० (अ) सर्वसाधारण महिला, (ब) सर्वसाधारण प्रभाग क्र.११(अ) नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला, (ब) सर्वसाधारण प्रभाग क्र.१२ (अ) अनुसूचित जाती महिला, (ब) सर्वसाधारण प्रभाग क्र.१३ (अ) अनुसूचित जाती, (ब) सर्वसाधारण महिला वरील आरक्षण जाहीर



# डॉ. रेवती आळवे यांना संत ज्ञानेश्वर श्रेष्ठ शिक्षक पुरस्काराने सन्मानित !!



नुकताच मुंबईत मराठा मंदिर संस्था आयोजित भव्य कार्यक्रमात, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ शैलेंद्र कुमार शर्मा, डॉ आफताब अन्वर शेख, डॉ शेहनाज शेख, डॉ प्रभू चौधरी, डॉ अलका नाईक, माया मेहता आणि डॉ बाबासाहेब तोरसकर यांच्या उपस्थितीत डॉ उर्वशी पांड्या यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन जेष्ठ समाजसेविका आणि गोरेगाव मुंबई महिला अध्यक्षा तसेच कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशनचे सभासद डॉ. रेवती कृष्णा आळवे यांना “संत ज्ञानेश्वर श्रेष्ठ शिक्षक- २०२५ पुरस्काराने” सन्मानित करण्यात आले.

## जिव्हेश्वर महिला भजनी मंडळाचे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील उत्कृष्ट सादरीकरण



परळी वै. वार्ताहर - जिव्हेश्वर महिला भजनी मंडळाचे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील उत्कृष्ट सादरीकरण झाल्याचे प्रतिपादन जिव्हेश्वर महिला विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.स्वातीताई विलासराव ताटे यांनी केले आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ गट कार्यालय लातुर विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर अंतर्गत धाराशिव येथील महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र येथे गटस्तरीय खुली महिला भजन स्पर्धा 2025 चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये परळी येथील अंबाजोगाई कामगार कल्याण केंद्र अंतर्गत जिव्हेश्वर महिला भजनी मंडळ यांनी भाग घेतला होता. उत्कृष्टरित्या सादरीकरण करण्यात आले. ज्यामध्ये सौ.स्वातीताई ताटे यांच्यासह सौ. कल्पना ठोंबरे, सौ. वैजयंती इंगळे, सौ. मंजूषा पोरे, सौ. किरण गालम, सौ. अंजली पोरे, सौ. राणी लटंगे, सौ.माया बडकस, तबला वादक परमेश्वर सोडगीर, हार्मोनियम वादक वैभव काळे इत्यादींनी भाग घेतला. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला महिलांचे कौतुक बघाण्यासाठी परळी येथील विलासराव ताटे, नारायण ठोंबरे गेले होते. हा कार्यक्रम गट कार्यालय लातुर यांनी धाराशिव येथे आयोजित केला होता. यामध्ये परिक्षार्थी त्या भागातील होते. त्यामुळे त्यांनी त्या भागातील भजनी मंडळाला झुकते माप दिले व इतरांना दिले नाही याची खंत ताटे यांनी व्यक्त केली.

# सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भुषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ संविधान प्रेमींकडून आज परळीत निदर्शने

परळी प्रतिनिधी. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर बूट फेक करणाऱ्या देशद्रोही वकील राकेश किशोर या वकिलावर गुन्हा दाखल करावा व या घटनेच्या निषेधार्थ परळी शहरात आज संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत.

भारतीय संविधान आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी या देशातील न्याय व्यवस्था सर्वात महत्वाचा घटक आहे. देशात कायद्याची अंमलबजावणी होते किंवा नाही,शासन - प्रशासन भारतीय संविधानानुसार काम करत आहे की नाही यावर लक्ष ठेवण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करीत असते.धर्मानिरपेक्षक्ष संविधान हे लोकशाहीचा आत्मा आहे. आणि देशातील या सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर एका सनातनी देशद्रोही वकिलाने बुट फेकून हल्ला केला आहे. हा हल्ला या देशाच्या न्यायव्यवस्थेवर आणि लोकशाहीवर झालेला आहे. ही घटना अत्यंत गंभीर



आणि देशद्रोहाचा गुन्ह्यासारखीच आहे.


या हल्लेखोर राकेश किशोर वकिलावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व त्याला केंद्र सरकारने अटक करावी या मागणीसाठी आज दिनांक 9 ऑक्टोबर रोजी राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक येथे सकाळी 11 वाजता तमाम संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत. या निदर्शनात शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांसाठी गोड बातमी, दिवाळीसाठी महामंडळाची मोठी घोषणा

एकीकडे एसटी कर्मचाऱ्यांनी १३ ऑक्टोबरपासून आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाचे बिगुल फुंकले असतानाच आता एसटी कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या सप्टेंबर महिन्याच्या पगारासाठी काल राज्य शासनाने ४७१.०५ कोटीचा निधी देण्यास मंजूरी दिली आहे. त्यातच आता दिपावली सणासाठी आता सण उत्सव अग्रीम उचल देण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाने आपल्या विविध देण्यांसाठी येत्या १३ ऑक्टोबरपासून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.त्यातच काल राज्य सरकारच्यावतीने एसटी कर्मचाऱ्यांचा सप्टेंबरचा पगार वेळेत व्हावा यासाठी ४७१.०५ कोटीचा निधी देण्यास गृहविभागाने मंजूरी दिली आहे. त्यामुळे सप्टेंबरचा पगार वेळेत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एसटीच्या ८३ हजार कर्मचाऱ्यांचे सप्टेंबरचे वेतन मिळणार आहे. आता एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळीचा सण तोंडावर आल्याने ऊत्सव अग्रीम उचल मिळण्याचाही मार्ग मोकळा झाला आहे. या वर्षाचा दिपावली हा सण दि.२१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. एसटी महामंडळाने या संदर्भात एक पत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार ज्या कर्मचाऱ्यांची रु. १२,५००/- उत्सव अग्रीम घेण्याची इच्छा आहे त्यांनी त्यांचे विभाग नियंत्रकांकडे अर्ज जमा करावेत. त्या अर्जाची तपासणी करुन पात्र कर्मचाऱ्यांची यादी १५ ऑक्टोबर २०२५ पर्यन्त या कार्यालयास पाठवावी असे आदेश देण्यात आले आहेत.

वेतन मर्यादा काय ?





महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन बीड यांचे कार्यालय,
विभागीय कार्यालय, बीड बसस्थानकाच्या बाजुला, बीड - ४३११२२ ई-मेल आय डी क्रं- stdiv4761acetbeed@gmail.com
जा.क्रं/राप/विनि/बीड/लेखा/वेतन/२०२५/५०२ दिनांक :- ०७.१०.२०२५
अत्यंत तातडीचे/महत्त्वाचे
प्रति,
यंत्र अभियंता(चा.),
उपयंत्र अभियंता/विभागिय वाहतूक अधिकारी/विभागिय कर्मवर्ग अधिकारी,
वि.भांडार अधिकारी/वि.सांख्यिकी अधिकारी/वि.कामगार अधिकारी,
वि.लेखाधिकारी/वि.सुरक्षा अधिकारी/वि.अभियंता(स्था.),
आगार व्यवस्थापक/लेखाकार,
रा.प.बीड/परळी/धारुर/माजलगांव/गेवराई/पाटोदा/आष्टी/अंबेजोगाई,

विषय--दिपावली २०२५ साठी सण उत्सव अग्रीम उचल देणे बाबत..
संदर्भ-परिपत्रक क.२६/२०२क.रा.प. आस्था/७०२/जीइ५८४.दि.५/१०/२०२३

वरील विषयी कळविण्यत येते की, सन २०२५ या वर्षाचा दिपावली हा सण दि.२१/१०/२०२५ दरम्यान साजरा करण्यात येणार आहे.
आपल्या कार्यक्षेतील कार्यरत ज्या कर्मचा-यांना रु.१२,५००/- उत्सव अग्रीम घेण्याची ईच्छा आहे त्यांचे अर्ज आपणाकडे जमा करावेत.व त्या अर्जाची तपासणी करुन पात्र कर्मचा-यांची यादी १५/१०/२०२५ पर्यन्त या कार्यालयास पाठवावी.
उत्सव अग्रीम मिळणेसाठी कमाल मूळ वेतन मर्यादा रु.४३४७७/- इतकी आहे याचाच अर्थ ज्या कर्मचा-यांचे मूळ वेतन रु. .४३४७७/- पेक्षा जास्त आहे असे कर्मचारी उत्सव अग्रीम मिळणे साठी पात्र ठरत नाहीत.
ज्या कर्मचा-यांची सेवानिवत्ती अग्रीम वाटपाषासून १० महिन्यांच्या आत असेल अशा कर्मचा-यांचे उत्सव अग्रीम अर्जाचा विचार करु नये.
अग्रीम वाटपाकरीता आपल्या घटकास किती रक्कम लागणार आहे याची माहिती दि.१५/१०/२०२५ पर्यन्त विभागिय लेखा अधिकारी राप बीड यांना कळवावी.
विभागिय कार्यालयातील इच्छुक कर्मचा-यांचे अर्ज हे संबंधित शाखा प्रमुख यांचे मार्फतच पाठविण्यात यावेत.स्वतंत्रपणे अर्ज सादर करु नयेत, ते स्वीकारले जाणार नाहीत.यांची नोंद घ्यावी.
उत्सव अग्रीम बाबत मध्यवर्ती कार्यालयाकडुनच निधी प्राप्त झाला तरच आपणास निधी पुरविला जाईल यांची नोंद आपण संबंधीत कर्मचा-यांना अर्ज भरताना कळविण्यात यावे.

विभाग नियंत्रक
रा.प.बीड

उत्सव अग्रीम मिळण्यासाठी कमाल मूळ वेतन मर्यादा रु.४३४७७/- इतकी ठेवण्यात आली आहे. याचा अर्थ ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन रु. ४३४७७/- पेक्षा जास्त आहे अशा कर्मचाऱ्यांना उत्सव अग्रीम मिळणार नाही असेही महामंडळाने स्पष्ट केले आहे. शिवाय ज्या कर्मचाऱ्यांची सेवानिवत्ती अग्रीम वाटपापासून १० महिन्यांच्या आत असेल अशा कर्मचाऱ्यांनी उत्सव अग्रीम अर्जाचा विचार करु नये असेही या पत्रकात म्हटले आहे. अग्रीम वाटपाकरीता आपल्या घटकास किती रक्कम लागणार आहे याची माहिती दि. १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत विभागिय लेखा अधिकारी राज्य परिवहनाला कळवावी असे या पत्रकात म्हटले आहे.

विभागिय कार्यालयातील इच्छुक कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज हे संबंधित शाखा प्रमुख यांच्या मार्फतच पाठवावेत. स्वतंत्रपणे अर्ज सादर करु नयेत, ते स्वीकारले जाणार नाहीत असेही पत्रकात म्हटले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com